# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**महाविद्यालये / तंत्रनिकेतनामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन स्वरूपात माहिती संकलित करून विद्यार्थ्यांना विविध सुविधा देण्यासाठी आवश्यक माहितीचे आदान–प्रदान सर्व यंत्रणाना करण्याकरिता विद्यापीठ / संचलनालय यांनी माहितीचे जाळे निर्माण करण्याबाबत.**

शासनाकडून विद्यापीठ / महाविद्यालयामध्ये विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय शिष्यवृत्ती / शुल्क प्रतिपुर्ती देण्यात येते. शासनाच्या त्या त्या योजनेच्या स्वरूपानुसार विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्तीच्या रकमा / सवलतीचा निधी थेट स्वरूपात बॅक खात्यावर (DBT) व्दारे जमा करणे शासनास सोईचे होणार असल्याने विद्यार्थीची ऑनलाईन स्वरूपात माहिती संकलित करून विद्यार्थ्यांना विविध सुविधा देण्यासाठी आवश्यक माहितीची आदान–प्रदान सर्व यंत्रणाना करण्याकरिता विद्यापीठ / संचलनालय यांनी माहितचे जाळे निर्माण करण्याबाबत शासनाने शासन निर्णय दि. २० / ०७ / २०१६ अन्वये सर्व संबधिताना सूचना दिलेल्या आहेत. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडत आहे.

विद्यापीठ विभाग व संलग्नित महाविद्यालयात विविध अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांची माहिती उचित व परिपुर्णरित्या संकलित करून त्याची काटेकोरपणे पडताळणी करणे शक्य व्हावे याकरिता विशेषत: विकेंद्रित स्वरूपात करण्यात येणारे प्रवेश हे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय प्रणालीव्दारे करण्याची कार्यवाही करण्याबाबत विद्यापीठ विभाग व सर्व संलग्नित महाविद्यालय / संस्था यांना विद्यापीठ परिपत्रक ६४ / २०१६ दि. २३ / ०३ / २०१६ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

या परिपत्रकाव्दारे सर्व संबधिताना कळविण्यात येते की, शासन निर्णय दि. २० / ०७ / २०१६ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सहा. कुलसचिव<br>
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )<br>
संदर्भ क्र. शै.प्रवेश / ३१६९ )<br>
दिनांक : २२ / ०८ / २०१६ )

प्रत:

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

मा. प्राचार्य / संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय / संस्था.

महाविद्यालये/तंत्रनिकेतनांमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची ऑनलाईन स्वरुपात माहिती संकलित करुन विद्यार्थ्यांना विविध सुविधा देण्यासाठी आवश्यक माहितीचे आदान-प्रदान सर्व यंत्रणांना करण्याकरीता विद्यापीठ/संचालनालये यांनी माहितीचे जाळे निर्माण करण्याबाबत...

Director BCUD Office
Savitribai Phule Pune University
10 AUG 2016
3441
11/08/16

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१५/प्र.क्र.३२५/तांशि-४,
दिनांक २० जुलै,२०१६

वाचा : १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४,दिनांक ३१ मार्च, २०१६.
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. ईबीसी- २०११/प्र.क्र.७४/मशि-२, दिनांक २५ मे, २०१२.

**प्रस्तावना :** राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैदयकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि विभाग, पशुसंवर्धन. दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय या विभागांच्या अधिपत्याखाली असणा-या व विदयापीठीय व महाविदयालयीन शिक्षण घेणा-या सामाजिक मागास व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील आणि अल्पसंख्यांक समुदायातील विदयार्थ्यांना राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती व अन्य सवलती/लाभ देण्यात येतात.

२. संदर्भिय शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे या विभागाच्या अखत्यारीतील शासकीय/अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविदयालये/तंत्र निकेतने आणि शासकीय विदयापीठांमध्ये विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती/शुल्क प्रतिपूर्ती देण्यात येते.

३. तथापि, केवळ पात्र व गरजू लाभार्थी विदयार्थ्यांनाच शासनाच्या सदरहू योजनेचा लाभ मिळण्यासाठी सदरच्या योजना प्रभाविपणे व वस्तूनिष्ठपणे पारदर्शकरित्या अंमलात आणण्यासाठी विविध उपाय योजना करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेऊन

उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे राज्यातील विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणा-या प्रवेशित विदयार्थ्यांची अचूकपणे माहिती संकलित करुन संबंधित पात्र विदयार्थ्यांच्या आधार क्रमांकाच्या सहाय्याने त्यांची अन्य वैयक्तिक माहितीची पडताळणी करण्यासाठी संबंधित लाभार्थी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रत्येक सत्राच्या परिक्षेस बसल्याची आणि शैक्षणिक संस्थेत त्याची नियमित स्वरुपात उपस्थिती असल्याची संगणकीय प्रणालीद्वारे खात्री करण्यासाठीची पध्दती / प्रणाली विकसित करण्याची जबाबदारी सर्व संबंधित संचालनालये व विदयापीठ यांच्यावर सोपविली आहे. जेणे करुन आवश्यकतेनुरुप त्या त्या योजनेच्या स्वरुपानुसार विदयार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमा/सवलतीचा निधी थेट स्वरुपात विदयार्थ्यांचे खात्यावर (DBT) द्वारे विहित मुदतीत जमा करणे सोईचे होईल. तसेच या प्रणालीद्वारे एकदा संकलित झालेल्या माहितीचा वापर हा पुढील वर्षाचे प्रवेश किंवा पुनर्प्रवेशाचे वेळी सहजपणे करुन त्याकरिता विदयार्थ्यांनी पूर्वी भरलेली माहिती वारंवार भरण्याची आवश्यकता भासणार नाही.

४. त्या अनुषंगाने शासनाच्या विविध योजनांचा लाभ/सवलती घेऊ इच्छिणा-या पात्र विदयार्थ्यांची परिपूर्ण वैयक्तिक माहिती ऑनलाईन प्रणालीद्वारे संकलित करुन पडताळणी करण्यासंदर्भात आणि विविध शासकीय यंत्रणांना आवश्यक असलेल्या माहितीचे अदान प्रदान ऑनलाईन पध्दतीने करण्यासाठी या विभागाच्या अखत्यारीतील सर्व संचालनालये/सर्व अकृषि विदयापीठे, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय/अशासकीय महाविदयालये, तंत्रनिकेतने यांचेकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** राज्यात उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण व व्यावसायिक शिक्षणाकरिता प्रवेश घेणा-या सर्व विदयार्थ्यांची वैयक्तिक माहिती उचित व परिपूर्णरित्या संकलित करुन त्यांची काटेकोरपणे पडताळणी करणे शक्य व्हावे याकरिता महाविदयालये/तंत्रनिकेतने यांच्या स्तरावर विशेषत: विकेंद्रित स्वरुपात करण्यात येणारे प्रवेश हे ऑन लाईन पध्दतीने संगणकीय प्रणालीद्वारे करण्याची कार्यवाही सर्व विदयापिठे/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि संबंधित संचालनालयांनी करावी.

२. राज्यातील सर्व अकृषि विदयापीठे/ महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांनी त्यांच्या अधिनस्त महाविदयालये / तंत्रनिकेतनांमध्ये प्रवेश घेणा-या विदयार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यासाठी करण्यात येणारी विदयार्थ्यांची माहिती महाविदयालयांकडून ऑनलाईन प्रणालीद्वारे प्राप्त करुन नोंदणी प्रक्रीया राबविण्यात यावी.

३. संबंधित सर्व महाविदयालये / तंत्र निकेतनांकडून प्रवेशित विदयार्थ्यांची व संस्थेची माहिती ऑनलाईन स्वरुपात संकलित करताना केंद्र शासनाने AISHE संकेतस्थळाच्या माध्यमातून प्रत्येक महाविदयालय/तंत्र निकेतनास दिलेल्या AISHE युनिक कोड क्रमांकाचा विदयापीठे/ महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने वापर करावा व या क्रमांकानुसार प्रत्येक महाविदयालय/ तंत्रनिकेतनातील संबंधित विदयार्थ्यांची व शैक्षणिक संस्थेची माहिती घेऊन त्याचे संकलन करावे.

४. याचप्रमाणे अकृषि विदयापीठे / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांनी संबंधित महाविदयालये/तंत्रनिकेतने यांचेकडून प्रवेशित विदयार्थ्यांची नोंदणीसाठी वैयक्तिक माहिती संकलित करताना ती जास्तीत जास्त परिपूर्ण असावी व यामध्ये संबंधित विदयार्थ्यांचा आधार क्रमांक व बँक खातेक्रमांक,( बँक शाखा IFSC Code इ. बँकेच्या तपशिलासह) याचा समावेश असावा. सदरची माहिती ही विदयार्थ्यांचे प्रवेश निश्चित करताना नोंदणीच्या वेळीच संगणकीय प्रणालीद्वारे महाविदयालय/तंत्रनिकेतनांकडून उपलब्ध करुन घेण्याची तरतूद प्रवेश अर्जाच्या नमुन्यात करावी.

५. सर्व अकृषि विदयापिठे/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांनी त्यांच्याकडे नोंदणी करण्यात येणा-या प्रवेशित विदयार्थ्यांसाठी कायम स्वरुपी असणारा विशिष्ट (unique) संगणकीय नोंदणी क्रमांक दयावा व त्याच्या आधारेच शिक्षण पूर्ण होईपर्यन्त संबंधित विदयार्थ्यांशी निगडीत असणा-या विविध बाबी उदा: पुढील प्रवेश, परीक्षा अर्ज करणे, निकाल प्रसिध्द करणे, विविध शिष्यवृत्ती/सवलती/लाभ देण्याबाबत माहितीची ऑनलाईन पडताळणी करणे, इत्यादिकरीता संबंधित अकृषि विदयापिठे / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, महाविदयालये, तंत्रनिकेतने व संचालनालये यांनी त्याचा उपयोग करावा.

६. अशा प्रकारे सर्व अकृषि विदयापीठे/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचेकडून प्रवेश प्रक्रियेच्या माध्यमातून संगणकीय प्रणालीद्वारे महाविदयालये/तंत्रनिकेतने व विदयार्थ्यांशी

संबंधित निर्माण झालेली माहिती, अभ्यासक्रमनिहाय निश्चित केलेले शुल्क इत्यादि बाबी/ अन्य विदयापीठ अथवा विभागाच्या अखत्यारीतील संचालनालये अथवा शुल्क प्रवेश नियामक प्राधिकरण इत्यादि यंत्रणांनी निर्माण केलेल्या संगणकीय प्रणालीशी जोडून माहितीचे जाळे निर्माण करण्याची तरतूद सर्व संचालनालये व अकृषि विदयापिठे/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांनी तात्काळ करावी.

७. सदर प्रयोजनार्थ प्रत्येक विदयापीठाने एका उप कुलसचिव दर्जाच्या अधिका-यास समन्वय/नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करावे व त्याचा तपशिल सर्व संचालनालयास व शासनास तात्काळ सादर करावा.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१६०७२०१७०७१००८०८ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

(म. मा. मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ३०५ शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०००५१
कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
सर्व विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये
उपसचिव (विशी / मशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई
उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व कार्यासने
निवडनस्ती, तांशि-४